Exh-5/D

*मनाई हुकुमाचा अर्ज*

**<u>मे.दिवाणी न्यायाधीश साहेब(क.स्तर)अंबाजोगाई यांचे न्यायालयात,</u>**

रे.दि.दा.नं. /2025

**अर्जदार/** :– **1)** **राधीका पि.सोमनाथ नागरगोजे,**
(वादी)
वय 1 वर्षे, धंदा काही नाही
रा.अंबलटेक ता.अंबाजोगाई जि.बीड.
ह.मु घाटनांदुर ता.अंबाजोगाई जि.बीड.
अ.पा.क आई वादी क. 2 नामे शितल भ्र. सोमनाथ नागरगोजे.

**2)** **शितल भ्र.सोमनाथ नागरगोजे,**
वय 27 वर्षे, धंदा घरकाम व शेती
रा.अंबलटेक ता.अंबाजोगाई जि.बीड.
ह.मु घाटनांदुर ता.अंबाजोगाई जि.बीड.

**विरूध्द**

**गैरअर्जदार/** :– **सोमनाथ पि.संजय नागरगोजे,**
(प्रतिवादी)
वय 29 वर्षे, धंदा मजुरी व ड्रायव्हर
रा.अंबलटेक ता.अंबाजोगाई जि.बीड.
ह.मु घाटनांदुर ता.अंबाजोगाई जि.बीड.

**प्रकरण : तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळणे बाबत.**

**अर्जदार/वादींचा ऑर्डर 39 रुल 1 व 2 आणि कलम 151 सी.पी.सी. अन्वये गैरअर्जदार/प्रतिवादींच्या विरुद्ध तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्या करीता खालील प्रमाणे विनंती अर्ज सादर आहे.**

Shitel

**1) हे की,** अर्जदार क्रं.1 व 2/वादीं क्रं.1 व 2 यांनी गैरअर्जदार/प्रतिवादींच्या विरुद्ध मा.कोर्टात चिरकाल मनाई हुकूमा बाबत चा दावा दाखल केला असून जो मा.कोर्टाचे विचाराधिन आहे.

**2) हे की,** वादी व प्रतिवादी हे मौजे अंबलटेक ता.अंबाजोगाई जि.बीड ह.मु घाटनांदुर ता.अंबाजोगाई जि.बीड येथील रहिवाशी असुन वादी क्र. 2 व प्रतिवादी हे आपसात पती पत्नी असुन वादी क्र.1 ही वादी क्र. 2 व प्रतिवादी यांची मुलगी आहे.

पान नं. 2 वर......

**3) हे की,** वादी व प्रतिवादी हे हिंदू एकत्र कुंटूबाचे घटक असुन त्यांच्या हिंदु एकत्र कुटुंबाच्या वडिलोपार्जीत मिळकतीचे उत्पन्नावर खरेदी केलेले मौजे.घांटनांदुर ता.अंबाजोगाई जि.बीड येथिल मिळकत फॅमीली अरेंजमेंट म्हणून प्रतिवादी यांच्या नावे नॉमीनल केलेल्या आहेत. परंतु या जमिन मीळकतीच्या वाटण्या आद्याप पावेतो झालेल्या नाहीत. त्या जमिनीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार | गाव | नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1) | 754 | 0.02.23 | 0.02 | घाटनांदुर | प्रतिवादी |

ज्याची चतु:सिमा पुढील प्रमाणे आहे. पूर्वेस – 20 फूट रस्ता, पश्चिमेस – 20 फूट रस्ता, दक्षिणेस – आरसुडे, उत्तरेस – गट क./प्लॉट नं. 68,69

येणेप्रमाणे चतु: सिमेच्या आतील एकुन क्षेत्र 0 हे.02.23 आर मिळकतीस दाव्यात वादग्रस्त जमीन म्हणुन संबोधण्यात येत आहे. सदर मिळकती मध्ये वादी यांचा कायदेशीर हिस्सा असुन, या मिळकतीच्या आजतागायत वादी व प्रतिवादी यांचेमध्ये कधीही वाटण्या झालेल्या नसुन सदर मिळकत वादी व प्रतिवादी यांचे संयुक्तीक कब्जे ताबा उपभोगात आहे.

**4) हे की,** प्रतिवादी हे वेगवेगळया व्यसनांचे आहारी गेलेले असुन कुटूंबाच्या अत्यावश्यक गरजे शिवाय केवळ आपल्या व्यसनपुर्ती करीता वादग्रस्त मिळकत कागदोपत्री त्यांच्या नांवे असल्याचा गैरफायदा घेवुन ते बेकायदेशिर रित्या ईतरांना विक्री करण्याच्या अत्यंत घाई गडबडीत असून ते लवकरच इतरांच्या हक्कात रजिस्टर्ड खरेदीखत करून देण्याची अथवा अन्य व्यक्तीचे नांवे कोणत्याही दस्ता अधारे वर्ग करण्याच्या अथवा गहान,दान, हस्तांतर करण्याच्या, अथवा त्यावर बोजा निर्माण दाट शक्यता आहे.तसे झाल्यास वादी यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे व प्रकरणात अधिक गुंतागुंत निर्माण होणार आहे. ज्याची वादींना खात्रीलायक माहीती मिळाल्याने वादींनी दि. 07/09/2025 रोजी प्रतिवादीची समक्ष भेट घेवून वादग्रस्त जमिन अन्य कोणास विक्री न करण्याची विनंती केली असता प्रतिवादी वादी ला म्हणाले की ही मिळकत माझे मालकीची आहे, मी विकल्याशिवाय राहणार नाही तुमचा या मिळकतीशी काहीही संबंध नाही,

Shital

पान नं. 3 वर......

तुम्ही या मिळकतीत पाय ठेवायचा नाही असे म्हणुन धमकी दिली व वादी यांचा वादग्रस्त मिळकतीवरील वादीच्या शांततामय ताबा उपभोगास हरकत अडथळा केला. करीता वादीला मा.कोर्टात प्रतिवादींचे विरुध्द प्रस्तुतचा दावा दाखल करणे भाग पडले असून दावा हक्क प्राप्तीची दिनांक 07/09/2025 ईसवी ही असुन दाव्याचा जवाब देण्याचा जवाब देण्याची प्रतिवादीवर जवाबदारी आहे.

**5) हे की,** वादी/अर्जदाराचा दावा खरा व बरोबर असुन वादीस मुळ दाव्यात यश येण्याची खात्री असुन सोयीचा समतोल व प्रथमदर्शनी केस ही वादी/अर्जदारांच्याच बाजुने आहे. एवढेच नव्हे तर वादी/अर्जदारांच्या हक्कात भक्कम असा कागदोपत्री पुरावा देखील आहे, परंतू मुळ दाव्याचा अंतीम निकाल लागण्यास विलंब लागण्याची दाट शक्यता असून यातील गैरअर्जदार/प्रतिवादीं केवळ त्यांच्या व्यसनपुर्ती करीता वादग्रस्त मिळकत ईतरांना बेकायदेशीर रित्या विक्री करण्याच्या अत्यंत घाई गडबडीत असून ते लवकरच इतरांच्या हक्कात रजिस्टर्ड खरेदीखतकरून देण्याच्या अटोकात प्रयत्नात आहेत.त्यात ते यशस्वी झाले तर परिणामी वादी/अर्जदारांवर कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. करीता अर्जातील मौजे. घाटनांदुर ता.अंबाजोगाई जि.बीड येथिल जमीन गट क्र. 754 क्षेत्र 0 हे. 02. 23 आर आकार 0.02 पैसे ज्याची चतु:सिमा पुढील प्रमाणे आहे.पूर्वेस – 20 फूट रस्ता, पश्चिमेस – 20 फूट रस्ता,दक्षिणेस – आरसुडे उत्तरेस – गट क्र./प्लॉट नं. 68, 69 या चर्तुःसिमेच्या आतील मिळकत आहे. या मिळकतीवरील अर्जदार/वादीचे ताबा उपभोगात यातील गैरअर्जदार/प्रतिवादीने मुळ दाव्याचा आंतीम निकाल लागे पावेतो कसल्याही प्रकारे हरकत अडथाळा करू नये व सदरची मिळकत अन्य कोणत्याही व्यक्तीचे नांवे कोणत्याही दस्ता अधारे वर्ग करू नयेत अथवा त्यावर कसल्याही प्रकारचा बोझा गहान, दान, हस्तांतर करू नयेत, अशा प्रकारचा तुर्तातुर्त मनाई हुकुम वादी/अर्जदारांच्या हक्कात आणि गैरअर्जदार/ प्रतिवादींच्या विरुद्ध दिला जाणे न्यायाचे दृष्टीने योग्य व आवश्यक आहे. सोबत वादी/अर्जदार क्र. 2 चे शपथपत्र दाखल आहे.

Shitay

**तरी विनंती की,**

अर्ज मंजूर करण्यात यावा व अर्जातील परिच्छेद कं.3 मधील मौजे. घाटनांदुर ता.अंबाजोगाई जि.बीड येथिल जमीन गट क्र.754 क्षेत्र 0 हे.02. 23 आर आकार 0.02 पैसे ज्याची चर्तु:सिमा पुढील प्रमाणे आहे.

पान नं. 4 वर......

पूर्वेस– 20 फूट रस्ता, पश्चिमेस – 20 फूट रस्ता,दक्षिणेस – आरसुडे उत्तरेस – गट क्र./प्लॉट नं. 68, 69 या चर्तुःसिमेच्या आतील मिळकतीवरील वादी/अर्जदारांचे शांततामय ताबा उपभोगात यातील गैरअर्जदार/प्रतीवादींनी मुळ दाव्याचा अंतीम निकाल लागे पावेतो स्वतः अथवा ईतरां मार्फत कसल्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये व सदरची मिळकत कोणासही विक्री वा अन्य प्रकारे हस्तांतरीत करु नयेत अगर त्यावर कसल्याही प्रकारचा बोज निर्माण करु नये,कोणासही गहान, दान, हस्तांतर करु नये, अशा प्रकारचा तुर्तातुर्त मनाई हुकुम वादी/ अर्जदारांच्या हक्कात आणि गैरअर्जदार/प्रतिवादींच्या विरुद्ध दन्यात यावा.

सोबत वादी/अर्जदार क्र. 2 यांचे शपथपत्र दिले आहे ते खरे आसे फक्त.

**दिनांक :– 29 /09/2025** **वादी,**

Shital

**शितल भ्र.सोमनाथ नागरगोजे**

( स्वतः व अज्ञान वादी क्रं.1 करीता )

प्रतिज्ञेवर सत्य निवेदन करते की, सदरील अर्जातील सर्व मजकुर माझे उत्तम माहिती, समजुती व वाचून/वाचून दाखविल्या नुसार खरा असुन त्यावर मी समजून उमजून सहया/तसदिका केल्या आहेत त्या ख–या व बरोबर आहेत असे फक्त.

**दिनांक :– 29 /09/2025** **वादी,**

Shital

**मार्फत,** **शितल भ्र.सोमनाथ नागरगोजे**

( स्वतः व अज्ञान वादी क्रं.1 करीता )

**ॲड.एम.एम.रूपनर.**